NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २५.१०.२०२६ रविवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २४.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करून एकुण १३,५९००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०३ केसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून एकुण ३,२८,५८५/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. दिनांक २४.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २५.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये **कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०२ इसमांवर** कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ५० केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ३९ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १३५ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २५४ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ८४ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ५८ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ४५ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ५५ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०२ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १६ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०९ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १०५४ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे १० केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १९ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,९८४ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ८,३६,४५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) पोलीस उपआयुक्त, परि.क्र. ६ यांचे विशेष पथकाची कामगिरी :– प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २४.१०.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ६ यांचे विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी शासन प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थांचे अवैध विक्रीबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, नारा गाव, माता मंदीरजवळ पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तिथे इसम नामे मयुर अशोक यादव वय ४० वर्षे रा. पवनपुत्र सोसायटी, नारा बसस्टॉप जवळ, जरीपटका, नागपूर हा त्याचे ताब्यात शासनाने प्रतिबंधीत केलेला वेगवेगळया कंपनीचे तंबाखु पॅकेट व पानमसाला हे अन्नपदार्थ मानवी आरोग्यास हानिकारक व अत्यंत अपायकारक असल्याचे माहित असुनही जाणुनबुजून मानवी

आरोग्यास धोका निर्माण करण्याचे हेतुने व स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता विक्री करण्याचे हेतुने बाळगतांना मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन वेगवेगळया कंपनीचे सुगंधीत तंबाखु पाकीटे एकुण वजनी २४.८४० किलोग्राम तसेच राजश्री, विमल, पिके, केपी ब्लॅक, इत्यादी कंपनीचे पाकीटे व पाऊच तसेच तंबाखुचे डब्बे असा एकुण ५६,४८५/– रु. चा शासनाने प्रतिबंधीत केलेला पानमसाला मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द फिर्यादी पोहवा रोमेश मेनेवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे कलम १२३, २२३,२७४,२७५ भा.न्या.सं. सहकलम २६(१),२६(२)(iv),३(१)(zz)(iv),२७(३)(ई),३०(२)(ए),५९ अन्न सुरक्षा मानके अधिनीयम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६), मा. श्री. सत्यवीर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. अमोल ढोकणे, पोहवा अरुण चांदणे, पोअं. स्नेहदीप पानतावणे, सचिन टांगले, मपोहवा आशा वानखेडे केली.



(गुन्हे)

<u>१) पोलीस ठाणे अंबाझरी :–शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>

दिनांक २४.१०.२०२६ चे २३.४० वा. ते दिनांक २५.१०.२०२६ चे ००.२५ वा. चे दरम्यान, अंबाझरी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, लॉ कॉलेज कंपाऊंडचे बाजुला एक काळी टिशर्ट व काळा पॅन्ट घातलेला इसम शस्त्रासह धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव उत्कर्ष उर्फ ऋषी दिनेशचंद्र रॉय वय २६ वर्षे रा. प्लॉट क्र. ५६, कोराडी ग्रामपंचायत जवळ, कोराडी, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत एका काळया रंगाचे कव्हरमध्ये एक लोखंडी चाकु किंमती २००/– रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे अंबाझरी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे वाडी :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी सचिन सुरेशराव सोमनकर वय ३८ वर्षे रा. सावळी (बीबी), कान्होलीबारा, ता. हिंगणा जि. नागपूर हे भारत सरकारने शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरण व कल्याणासाठी, शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) या योजनेअंतर्गत स्थापन झालेल्या कान्होलीबारा फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लिमीटेड चे सीईओ असुन फिर्यादीचे कंपनी मार्फत मेसर्स वरुण इंटरप्रायझेस, वाडी, नागपूर चा मालक आरोपी सुदर्शन हयग्रीव राव वय ४८ वर्ष रा. मुंजे चौक, हल्दीराम हॉटेलमागे, सिताबर्डी, नागपुर याने दिनांक १०.०२.२०२६ चे १०.०० वा. ते दिनांक २५.०५.२०२६ चे २०.०० वा. चे दरम्यान, शेतकऱ्यांचा शेतमाल १) तांदुळ ५२३ पोती (३० किलो प्रती पोती) २) तुर ७५,३१५ किलो ३) चना १७,२६५ किलो असा शेतमाल खरेदी करुन एकुण रक्कम ७८,९३,७५४/— रु. पैकी आरोपीने फिर्यादीचे कंपनीला ३५,५५,३८०/— रु. पेमेंट केले. उर्वरीत ४३,३८,३७४/— रु. पेमेंट न करता, फिर्यादीची कंपनी व शेतकऱ्यांची फसवणुक केली. तसेच आरोपीने इतर पाच ग्रामिण/अर्बन/कंपनी/कृषी उत्पन्न बाजार समितीचे दलाल यांचेकडून सुध्दा शेतमाल घेऊन त्यांना रक्कम न देता, त्यांचीही ३९,७४,६३८/— रु. ची अशी एकुण ८३,१३,०१२/— रुपयांची फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. संतोष शिरडोळे ८८८८८७६५८३ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१६(५),३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे हुडकेश्वर :— दिनांक २४.१०.२०२६ चे २३.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाऊ नामे आर्यन गुणवंता लांडे वय २० वर्ष रा. प्लॉट क्र. ७४, महाकली नगर, हुडकेश्वर, नागपूर हा त्याचे मित्राची गाडी घेऊन सोबत मित्र नामे प्रथमेश योगेश शिरपुरकर वय २२ वर्ष रा. प्लॉट क्र. १८४, भोलेबाबानगर याचेसोबत आऊटर रिंग रोड येथे जेवण करुन घरी परत येत असता, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत पिपळा खरसोली रोड, डिमार्ट जवळ, आस्था नगर चे बाजुला, हुडकेश्वर येथे रस्त्यावरील दगडावरुन गाडी गेल्याने, त्यांचे संतुलन बिघडुन गाडी डिव्हायडरला धडकल्याने दोघेही खाली पडल्याने गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, ट्रॉमा सेंटर, येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान फिर्यादीचे भावास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. जखमी प्रथमेश याचा उपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी अमन गुणवंता लांडे वय २३ वर्ष रा. प्लॉट क्र. ७४, महाकली नगर, हुडकेश्वर, नागपूर यांचे सुचनेवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि नरेश साखरकर ९३२२२२४२४५ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.